International Indexed & Refferred Research Journal, ISSN-2250-2599; Vol. I* ISSUE -1 Oct., 2012

शोध पत्र- शिक्षा

# शिक्षण प्रक्रियेतील जबाबदार घटकाची भूमिका- एक दृष्टिक्षेप

* डॉ. मोहन ना. खताळ ** गजानन फकिरा डोईफोडे

**प्रस्तावना :-**

'सर्व शिक्षा अभियानाची यशस्वी अंमलबजावणी आणि १ एप्रिल २०१० पासून लागू झालेला, बालकांचा मोफत व सक्तिच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम २००९' या कायद्यामुळे शिक्षण प्रक्रियेला वेग आला. प्रारंभी प्राथमिक व आता माध्यमिक स्तरावरील पहिलया टप्प्यात शासकीय, स्थानिक स्वराज्य संस्थाच्या इयत्ता ९ वी व १० वी चे वर्ग असणाऱ्या माध्यमिक शाळांसाठी या अभियानात कालांतराने इतर खाजगी शाळांचा समावेश होणार आहे.

शासनाच्या या अभियानाच्या माध्यमातून अनेक अपेक्षा आहेत, अर्थातच ह्या अपेक्षा पूर्णत्वास नेण्यास सार्वत्रिक सहकार्याची आवश्यकता असते. अभियान यशस्वी करण्यासाठी शासनाने काही ठराविक घटकांवर जबाबदारी निश्चित केली असली तरी शिक्षकांबरोबरच विद्यार्थी, पालक व समाजाची या अभियानासाठी गरज भासणार आहे, यातील एक जरी घटक जबाबदारीत कमी पडला तर ह्या अपेक्षा पूर्णत्वास जाणार नाहीत.

वंचित घटकांना शिक्षणाच्या प्रवाहात आणणे. हा प्रमुख उद्देश आहे. त्याच बरोबर त्यांच्यात गुणवत्ता आणणे. हेही एक लक्ष या अभियानाचे आहे. वंचित घटकांना शिक्षणाच्या प्रवाहात आणणे व त्यांच्यात गुणवत्ता निर्माण करणे. ह्या वेगवेगळया बाबी आहेत. शिक्षणाच्या प्रवाहात आणणे येवढे कठीण काम नाही. परंतू त्यांच्यात गुणवत्ता एकाएकी निर्माण करता येईल की नाही याबाबत शंका निर्माण होते.

वंचित घटकातील मुले ही भिन्न परिस्थितीमधून आलेली असतात. त्यांच्या समस्या देखील ह्या भिन्न असतात. शिक्षण प्रवाहात रुळलेली मुले व वंचित घटकांतील मुले यांच्या तुलनाच होवू शकत नाही. तरीदेखील या दोन्ही परिस्थितीतील मुलांसाठी सारखा, एकच अभ्यासक्रम आहे. वंचित घटकांतील मुलांमध्ये गुणवत्ता येणारच नाही असे नाही. परंतू याला काही कालावधी लागेल. या प्रवाहात जोपर्यंत ती मुले रुळणार नाहीत, तोपर्यंत अशा विद्यार्थ्यासाठी शिक्षणाची आवड निर्माण करणारा अभ्यासक्रम निर्माण व्हायला हवा. दोन्ही मुलांसाठी एकच अभ्यासक्रम राबवला तर त्यांच्यात न्यूनगंड निर्माण झाल्याशिवाय राहणार नाही.

शाळेत भौतिक, शैक्षणिक, आरोग्य विषयक, पोषण आहार इ. सुविधा देवून विद्यार्थ्यांमध्ये शिक्षणाची आवड निर्माण होईल का? संस्था प्रमुख व शिक्षकांबरोबरच पालकाला शिक्षणाची गरज व महत्व पटले तरच विद्यार्थ्याला शिक्षणात गोडी निर्माण होईल. ही जबाबदारी शिक्षण संस्थाच्या संबंधित घटकांबरोबर समाजातील जबाबदार घटकाने सार्वत्रिक जबाबदारी स्विकारली तरच वंचित घटक शिक्षण प्रवाहात येवून त्यांच्यात गुणवत्ता येईल.

**अभियानाची प्रमुख उद्दिष्टे**

१. वंचित घटकांना शिक्षण प्रवाहात आणणे.
२. शिक्षणातील अडथळे दूर करुन तशा सुविधा उपलब्ध करुन देणे.
३. २०१७ पर्यंत माध्यमिक शिक्षणाचे सार्वत्रिकरण करणे.
४. २०२० पर्यंत माध्यमिक शिक्षणाची गळती शून्यापर्यंत आणणे.
५. सर्व घटकांना माध्यमिक शिक्षणाची समान संधी उपलब्ध करुन देणे.
६. माध्यमिक शिक्षणाची गुणवत्ता सुधारणे.
७. भौतिक व शैक्षणिक सुविधा उपलब्ध करुन देणे.

**शिक्षण प्रक्रियेतील जबाबदार घटक**

शिक्षण प्रक्रिया पूर्ण करण्याची जबाबदारी किंवा काम हे केवळ एका घटकाचे नाही. शिक्षक व विद्यार्थी हे शिक्षण प्रक्रिया सातत्यपूर्ण सुरु ठेवण्याचे मुख्य घटक असले तरी यासाठी पालक व समाजाचे सकारात्मक सहकार्य आवश्यक आहे. प्रश्न फक्त वंचित घटकांचा आहे. इतर मुलांसाठी हे अभियान राबविले नाही तरी देखिल ते शिक्षणाच्या प्रवाहात स्वत:हून येतील व गुणवत्ता सिध्द करतांना आपण आज बघतो आहे.

वंचित घटकांच्या विद्यार्थ्यांबाबत अजूनही पालक व समाजात शिक्षणाला म्हणावे तसे महत्व दिले जात नाही, असे चित्र दिसते. शाळेत मिळणाऱ्या सुविधांची चौकशी पालकांकडून होत असते. शैक्षणिक प्रगतीची चौकशी करतांना फारच थोडे पालक दिसतात.

**शिक्षणाची गरज**

"शिक्षणाचा हक्क व सक्तीचे शिक्षण" यामुळे वंचित घटकातील मुले शिक्षण प्रवाहात येतील यात शंका नाही. गुणवत्ता सिध्द करण्यासाठी प्रथम पालक पर्यायाने विद्यार्थ्यांना शिक्षणाची गरज वाटली पाहीजे. प्रमुख जबाबदार घटक आपली जबाबदारी पूर्णपणे पार पाडतीलच. परंतू इतर घटकांनी सुध्दा आपली सामाजिक जबाबदारी स्वत:हून उचलावी. केवळ बघ्याची भूमिका शिक्षणाला तारणाऱ्या नाहीत. जीवनात शिक्षणाला अन्नाऐवढी आवश्यकता / गरज असते.

**शासनाकडून सकारात्मक प्रयत्न !**

शिक्षणाच्या बाबतीत शासनाकडून सतत सकारात्मक प्रयत्न होत आहेत. सर्व शिक्षा अभियान व माध्यमिक शिक्षा अभियानाव्दारे शासन स्तरावरून विविध योजना कार्यान्वित होत आहेत. देणारा देतो घेणाऱ्याचा दृष्टिकोन सकारात्मक असला पाहीजे. तरच काहीतरी घेता येईल.

**शिक्षणाच्या सोयी**

विद्यार्थी शिक्षणाच्या प्रवाहात आल्यानंतर त्याच्यामध्ये गुणवत्ता येण्यासाठी भौतिक व शैक्षणिक सोयी असणे गरजेचे असते. शाळा, पात्र व अनुभवी अध्यापक वर्ग, बैठक व्यवस्था, पिण्याचे पाणी, मुला-मुलींसाठी स्वतंत्र स्वच्छता गृह, विज्ञान कक्ष, वाचनालय इ. बाबी विद्यार्थ्यांच्या प्रगतीत महत्वपूर्ण भूमिका बजावत असतात. हया सोयी शासन या योजनेंतर्गत पूरवित आहे. ह्या सर्व बाबी विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेत वाढ करण्यास उपयुक्त ठरू शकतात.

**सर्वांना समान अभ्यासक्रम** ज्यांची दुर्बल आर्थिक परिस्थिती, डोंगराळ भाग, आदिवासी भाग, अंध, अपंग, अर्थात शिक्षणापासून अशी मुले

वेगवेगळया कारणाने दूर आहेत. त्यांना आपण वंचित घटक म्हणतो. अशा घटकांना शिक्षण प्रवाहात आणतांना त्यांच्या परिस्थितीचा देखिल विचार होणे आवश्यक आहे. त्यांच्या समस्यांचे स्वरुप देखिल वेगळे आहे. त्यांना शिक्षण प्रवाहात आणणे हे फार मोठे कार्य ह्या माध्यमातून होणे अपेक्षित आहे. जेव्हा अशी मुले शिक्षण प्रवाहात येतील तेव्हा त्यांना शैक्षणिक समायोजन करायला काही कालावधी लागेल. त्यांच्या प्रगतीचा वेग हा कमी असेल.

जी मुले या आधीच शिक्षणाच्या प्रवाहात स्थिर झालीत, प्रभुत्व पातळीच्या दिशेने प्रगती करीत आहेत. अशा मुलांसोबत या मुलांची तुलना होवूच शकणार नाही. सर्वांना समान अभ्यासक्रम असल्याने आणि शैक्षणिक समायोजनात त्यांचा बराच वेळ गेल्याने सहाजिकच ही मुले अभ्यासात मागे पडतील. त्यामुळे त्यांच्यात न्यूनगंड निर्माण होण्याची दाट शक्यता असते. अशा वंचित घटकांसाठी विशेष अभ्यासक्रम तयार करता येवू शकतो. एकदा ही मुले शिक्षण प्रवाहात स्थिर झाली की त्यांना सर्वांसाठी असलेला समान अभ्यासक्रम देता येईल. विद्यार्थ्यांची गळती थांबण्यास याची मदत होवू शकेल.

**उपक्रमशीलतेला वाव**

शिक्षक, विद्यार्थी किंवा शिक्षणाच्या संबंधित घटकाने एखादा उपयुक्त उपक्रम, प्रकल्प राबविण्याचे ठरविले असेल तर त्यासाठी सर्व शिक्षा अभियानात आर्थिक तरतूद केलेली आहे. शिक्षणाच्या संबंधित अनेक घटक असे उपक्रम राबवित असतात. मात्र असे बरेच घटक प्रसिध्दीपासून लांब असतात. काहींना प्रसिध्दीही नको असते. हा त्यांचा मोठेपणा झाला, परंतू त्यांनी राबविलेले उपक्रम, प्रकल्प प्रसिध्द झाले पाहिजेत. याचा शोध कोणीतरी घेतला पाहिजे. असा प्रयत्न होताना दिसत नाही. त्याचबरोबर शिक्षण संस्थेत त्यांना प्रोत्साहन दिल्या गेले पाहीजे.

**सर्व शिक्षा अभियान आणि संबंधित घटक**

सर्व शिक्षा अभियानांतर्गत जेवढया आवश्यक सोयी शिक्षणासाठी देणे शक्य झाले. त्या सोयी शासनाने उपलब्ध करुन दिल्यात. मात्र शिक्षणाच्या संबंधित असलेले घटक कमी पडतांना दिसत आहेत. दोन्ही बाजूने काम झाले तर शिक्षणाची प्रक्रिया सुरळीत व यशस्वी होण्यास मदत होते.

सर्वच बाबी शासनावर ढकलून आमचे ते कामच नाही. अशी भावना काहीशी दिसते आहे. सकारात्मक भावना वाढीस लागण्याची गरज आहे. शिक्षणाच्या संबंधित घटकाने आपली जबाबदारी आनंदाने स्विकारली पाहिजे.

**समारोप**

सर्व शिक्षा अभियानाने सर्व सोयी उपलब्ध करुन दिल्यात. बालकांना मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार मिळाला म्हणजे इतर बाबी आपोआपच घडतील. असा चमत्कार होईल. अशी भावना व्यक्त करु नका. मार्ग दाखविण्याचे काम या माध्यमाने केले. मार्गक्रमण शिक्षणाच्या संबंधित घटकाला करायचे आहे.

शासन, शिक्षणसंस्थेशी निगडित घटक, समाजाला मिळून विद्यार्थ्यांना शिक्षण प्रक्रियेत समाविष्ट करुन घ्यायचे. कालांतराने त्याच्यात गुणवत्ता दिसली पाहीजे असे सकारात्मक प्रयत्न व्हायला हवेत. वंचित घटकांना शिक्षणाच्या प्रवाहात आणण्याची जबाबदारी केवळ कोणत्याही एका घटकाची नाही. त्यासाठी सार्वत्रिक जबाबदारी उचलणे गरजेचे आहे. तरच शिक्षणाला भविष्य आहे.

*** मार्गदर्शक, शासकीय अध्यापक महाविद्यालय, अकोला**
**** संशोधक, जि. प. ( मा. शा. ) माध्यमिक शाळा, बाळापूर**

**संदर्भ ग्रंथ**

१. राष्ट्रीय माध्यमिक शिक्षा अभियान, शाळा व्यवस्थापन व विकास समिती प्रशिक्षण कार्यक्रम २०११-१२
२. सदस्यांकरीता हस्तपुस्तीका - महाराष्ट्र शैक्षणिक नियोजन व प्रशासन संस्था, औरंगाबाद.